# देगलूर महाविद्यालयाच्या खेळाडूची निवड



अनिल हेमनर

देगलूर : देगलूर महाविद्यालयाच्या विद्यार्थी हेमनर अनिल याची मंगलोर विद्यापीठ, मंगलोर, कर्नाटक येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठीय मैदानी स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेडच्या संघात निवड झाली आहे. देगलूर महाविद्यालयाचा खेळाडू श्री हेमनर अनिल याची १०० मीटर व २०० मीटर धावणेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंचे प्रशिक्षक म्हणून डॉ. निरजकुमार उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंचे अभिनदंन अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे. चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, ऊपप्राचार्य निवृती गोविंदवार, प्रसिध्दि प्रमुख डॉ. बी. आर. कत्तुरवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी आभिनंदन केले आहे.